# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग महाराष्ट्र मुंबई

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१
०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१० फॅकस ०२२ २२०१८५३९ E-mail : mah-sforum@nic.in Website:- www.grahak.maharashtra.gov.in

जा.क्र.राआ/महा./PRO/ २०२०/ १३३३ दिनांकः- १६.०३. २०२०

## परिपत्रक

संदर्भः- १. महाराष्ट्र शासनाचे आरोग्य विभागाचे क्र. करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५ दि. १४.०३.२०२० रोजीची अधिसुचना
२. ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ मधील कलम २४(ब)

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाचे आरोग्य विभागाने कोरोना वायरसचा संसर्ग व फैलाव रोखण्याबाबत संदर्भ क्र. १ ची अधिसुचना पारित केली आहे, व त्यासाठी कार्यालयीन ठिकाणी होणारी गर्दी कमी करणे, तसेच टाळणे गरजेचे आहे, त्याअर्थी राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगास ग्राहक संरक्षण अधिनियम कलम २४(ब) द्वारे प्राप्त अधिकारानुसार सदर परिपत्रकाद्वारे सर्व वकीलवर्ग, पक्षकार तसेच, सर्व संबधितांना कळविण्यात येते की, दि. १६.०३.२०२० ते ३१.०३.२०२० या कालावधीत राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगासमोर फक्त तात्काळ आदेश पारित करणे आवश्यक असणा-या प्रकरणांची ( Urgent Matters) ची सुनावणी घेण्यात येईल, व अन्य प्रकरणांमध्ये तारखा दिल्या जातील, सदरच्या काळात सर्व संबधितांनी राज्य आयोगाचे मुंबई, औरंगाबाद, नागपुर तसेच आयोगाची परिक्रमा खंडपीठे येथील कार्यालयात अनावश्यक गर्दी करण्याचे टाळावे. आरोग्याच्या दृष्टीने व संसर्ग फैलाव टाळण्यासाठी सर्वांनी आयोगातील कर्मचा-यांचे सुचनांचे काटेकोर पालन करून मदत करावी.

सदरचे परिपत्रक राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अधिनस्त असलेल्या महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाना सुद्धा लागू करण्यात आले आहे.

( न्या. अ. पी. भंगाळे)
अध्यक्ष,
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र मुंबई